**RNI No. MAHBIL /2009/35530**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

**वर्ष ९, अंक २७]** **सोमवार, जुलै १०, २०२३/आषाढ १९, शके १९४५** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००**

**असाधारण क्रमांक ३६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.—** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. .. .. | १-३ |

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १० जुलै २०२३.

**MAHARASHTRA ORDINANCE No. V OF 2023.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA
CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २०२३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; १९६१ चा महा. २४.

**त्याअर्थी,** आता, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेतः—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ७३ मध्ये, पोट-कलम (१अ) मधील, खंड (अ) मध्ये, " तिची नोंदणी झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत " या मजकुराऐवजी, " तिची नोंदणी झाल्याच्या किंवा, यथास्थिति, पुनर्रचना केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत " हा मजकूर दाखल करण्यात येईल. १९६१ चा महा. २४.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम १०१ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम १०१ मध्ये , पोट-कलम (१) मधील, " वैयक्तिक " हा मजकूर वगळण्यात येईल.

## निवेदन

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) याच्या कलम १९ मध्ये, एखाद्या संस्थेच्या विशेष सर्वसाधारण सभेत, संस्थेची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव मान्य करण्यात आल्यानंतर, निबंधकाकडे अर्ज केल्यावर अशा संस्थेची पुनर्रचना करण्याची तरतूद आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ७३ मधील पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) मध्ये, नव्याने नोंदणी केलेल्या संस्थेच्या समितीच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची कर्तव्ये पार पाडण्यासाठी तात्पुरती समिती नेमण्याची तरतूद आहे. तथापि, पुनर्रचना केलेल्या संस्थेची तात्पुरती समिती नेमण्यासाठी उक्त अधिनियमामध्ये उपरोक्त कोणतीही तत्सम तरतूद केलेली नाही.

म्हणून, पुनर्रचना केलेल्या संस्थेच्या बाबतीत तात्पुरती समिती नेमण्यासाठी तरतूद करण्याकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ७३ च्या पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते.

२. उक्त अधिनियमाच्या कलम १०१ चे पोट-कलम (१) हे, इतर गोष्टींबरोबरच, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने, केवळ तिच्या वैयक्तिक सदस्यांना दिलेल्या आगाऊ रकमांची वसुली करण्याचे अधिकार प्रदान करते. म्हणून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने तिच्या संस्था सदस्यांना दिलेल्या आगाऊ रकमांची वसुली करणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस शक्य व्हावे या दृष्टीने, उक्त अधिनियमाच्या कलम १०१ च्या पोट-कलम (१) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट वाटते.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **रमेश बैस,**

दिनांक ८ जुलै २०२३. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेश कुमार,**

शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.